# स्वप्न आणि सत्य व इतर

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**स्वप्न आणि सत्य व इतर : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २१०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# स्वप्न आणि सत्य

# अनुक्रमणिका

## स्वप्न आणि सत्य


- स्वातंत्र्य आणि स्वराज्य ....... ७
- जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्र व सामाजिक समता ....... १६
- सर्वोदय व अनाग्रही निष्ठा ....... २९
- समाजवाद ....... ३९
- सत्याग्रह ....... ५०
- संयुक्त महाराष्ट्र, आंतरभारती व एकात्म भारत ....... ६०
- संस्कृती व साहित्य ....... ८१
- राष्ट्रीय चारित्र्य ....... ९०
- संतांचा मानवधर्म ....... ९६
- निसर्ग ....... १२३
- मृत्यूचे काव्य ....... १३५


## विश्वभारती


- एक सुंदर चिनी पत्र ....... १४५
- एक चिनी लेखक ....... १४८
- सादी ....... १५०
- फिरदौसीचे तेजस्वी उत्तर ....... १५३
- महान तत्त्ववेत्ता नित्शे ....... १५५
- जलालुद्दीन ....... १५७
- मानसशास्त्रज्ञ फ्राइड ....... १६३
- अंधार अंधार ....... १६६
- विश्वमंगल ....... १६८

भारतीय नारी


- वेदकाल ....... १७१
- वेदोत्तरकाल ....... १७३
- इस्लामच्या आगमनानंतर ....... १७७
- इंग्रजी अमदानी ....... १८४
- स्वातंत्र्याचा उषःकाल ....... १९०


विश्वदर्शन


- प्रस्तावना ....... १९९
- विश्व हे अनंत ....... २०३
- सजीव सृष्टी ....... २०६
- भावनाविश्व ....... २०९
- जीवशास्त्राची वाटचाल ....... २१४


✦✦✦

# स्वातंत्र्य आणि स्वराज्य

**स्वातंत्र्यानंतर तीन वर्षांच्या आतच गुरुजींनी जगाचा निरोप घेतला, तो भग्न आशा आणि निराशेत. गुरुजींनी स्वराज्याचे जे दिव्य स्वप्न पाहिले ते अणुमात्रही प्रत्यक्षात अवतरले नाही. शेतकऱ्यांना, गरिबांना मी आश्वासने दिली त्यांना आता तोंड कसे दाखवू या भावनेने सानेगुरुजी तडफडत होते. गुरुजींच्या शब्दांतच स्वराज्याचे शब्दबद्ध केलेले चित्र......**

ब्रिटिशांची सत्ता आपल्या देशात दृढ झाल्यापासून आपले फायदे काय झाले ते मला तरी सांगता येत नाहीत; परंतु सहस्रावधी तोटे झाले ते पर्वताप्रमाणे डोळ्यांसमोर उभे राहतात. आपण नि:शस्त्र केले गेलो. आपले पौरुष मारले गेले. आपला आत्मा खच्ची करण्यात आला. आपण लुळे व बुळे झालो. सदासर्वदा सरकारच्या तोंडाकडे पाहणारे आपण झालो. आपली कर्तृत्वशक्ती गेली, आपले धैर्य गेले. पोलीस हा आपला राजा झाला. वाघाशीही झुंज घेणारे पोलीस पाहून भिऊ लागले. पोलीस हा परमेश्वर. तो मागेल ते द्यावे. तो म्हणेल तेथे यावे. आपण गाईहूनही गाय झालो. गायही पिळून पिळून शेवटच्या थेंबापर्यंत दूध काढणाऱ्याला लाथ मारते; परंतु आपणात रामच उरला नाही. बस म्हटले की बसावे, ऊठ म्हटले की उठावे, अशी जनतेची स्थिती झाली.

ब्रिटिशांच्या सत्तेने माणसांची मेंढरे केली. काँग्रेस मायमाउलीने अवतार घेतला. तिने पुन्हा माणुसकी दिली. ब्रिटिश सत्तेमुळे माणसांची माणुसकी गेली. उद्योगधंदे सारे बुडाले, बुडविण्यात आले. जेथे सोन्याचा धूर निघे तेथे रडण्याचा सूर घरोघर निघू लागला. कोट्यवधी लोक बेकार झाले. लाखो अर्धपोटी राहू लागले. बेकारी वाढली, त्याबरोबरच दुष्काळही वाढले. पूर्वी शंभर वर्षांत एखादा दुष्काळ पडे तर

आता दरसालच जणू दुष्काळ. दुष्काळात टिकाव धरणे कठीण होऊं लागले. लोकांमध्ये प्राणच उरले नाहीत. जरा पावसाने डोळे वटारले की जनतेचे डोळे पांढरे होतात. महिनाभर पाऊस न पडला तर लगेच आईबाप चार चार आण्यांत पोटचे गोळे मिशनरी लोकांना विकू लागतात.

बेकारी, दुष्काळ, त्यांच्याबरोबरच नवीन नवीन व्यसने आणि नवीन नवीन रोगही आले. जुगार रूढ झाले. दारू गावोगाव झाली. प्लेग, कॉलरा, इन्फ्लुएन्झा आले. भांडणे वाढली. आमच्यामध्ये भेद पाडण्यात आले. नोकरीशिवाय दुसरा उद्योगधंदा नसल्यामुळे हे भेद आणखीनच वाढले. हिंदू, मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य या सर्वांच्या मुळाशी पोटापाण्याचा प्रश्न आहे. तुला नोकरी की मला, तुझ्या लोकांना किती प्रमाणात, माझ्या लोकांना किती प्रमाणात, याच गोष्टीला महत्त्व आले. कर्तृत्वाला वावच कोठे उरला नाही. असा हा राष्ट्राचा अंतर्बाह्य नाश या दीडशे वर्षांत झाला. आणि स्वातंत्र्य पाहिजे ते मूठभर भांडवलवाल्यांचे नव्हे, खरे गोरगरिबांचे स्वातंत्र्य हवे. असे स्वातंत्र्य येईल तेव्हाच रोग हटतील, पोटभर खायला मिळेल, ज्ञान येईल, आनंद येईल.

असे गरिबांचे स्वातंत्र्य आणण्यासाठी एक काँग्रेस धडपडत आहे. बाकी इतर संस्थांचे गरिबांकडे लक्षही नाही. इतर संस्था वरिष्ठ वर्गाच्या, वरिष्ठ जातींच्या. कोट्यवधी शेतकरी, लाखो कामकरी यांच्याकडे काँग्रेसचे लक्ष आहे, अधिकाधिक जात आहे. इतर संस्था धर्माच्या नावाने ओरडत आहेत; परंतु खरा धर्म सर्वांना सुखी करणे हा आहे. ब्रह्माच्या अनेक व्याख्या आहेत; परंतु पहिली व्याख्या जी शिकविली पाहिजे ती म्हणजे अन्नब्रह्म. परंतु हा ओदनरूपी परमेष्ठी, हे अन्नब्रह्म सर्वांना नेऊन भेटवू असे कोणाला वाटते आहे? कोट्यवधी लोकांच्या पोटात घास नाही म्हणून कोणाला पोटदुखी लागली आहे? धर्माच्या वरवरच्या गप्पा काय कामाच्या?

भगवान बुद्धांनी एकदा शिष्यांना सांगितले, ''जा आता दशदिशांत आणि प्रेमाचा उपदेश करा.'' शिष्य निघाले. काही शिष्यांना जवळच एका झाडाखाली एक मनुष्य आढळला. ते शिष्य त्याच्याजवळ गेले आणि म्हणाले, ''म्हण, अक्रोधाने क्रोध जिंकावा, जगाला प्रेम द्यावे' म्हण.'' तो म्हणेना. शिष्य म्हणाले, ''याला उचलून भगवान बुद्धाकडे नेऊया.'' त्यांनी त्याला उचलून बुद्धांकडे आणले. ते म्हणाले, ''भगवान, हा नास्तिक दिसतो. याला सूत्रे शिकवतो तर म्हणत नाही.'' कारुण्यसिंधू



बुद्धदेवांनी त्या माणसाकडे पाहिले. ते शिष्यांना म्हणाले, ''घरात काही फळे असली तर त्याला आणून द्या. काहीतरी याला आधी खायला द्या.'' शिष्यांना आश्चर्य वाटले. धर्मसूत्रे शिकविण्याऐवजी आधी हे खायला कसे देतात! परंतु त्यांनी सांगितल्याप्रमाणे केले.

नंतर बुद्धदेव त्या माणसाला म्हणाले, ''मित्रा, आता झोप; विश्रांती घे.'' तो मनुष्य झोपला. ''भगवान, तुम्ही त्याला धर्म शिकविण्याऐवजी खायला दिलेत, झोपायला सांगितलेत हे कसे?'' शिष्यांनी विचारले. बुद्धदेव म्हणाले, ''या माणसाजवळ अन्नाच्या भाषेत बोलले पाहिजे; तरच त्याला समजेल. उपाशीपोटी माणसाजवळ अन्नाच्या भाषेत बोला. त्याला अन्नदेव नेऊन प्रथम भेटवा. पोटभर लोक जेवू देत. नीट झोप घेऊ देत. मग त्याच्याजवळ इतर गोष्टी बोलू.'' हिंदुस्थानातील कोट्यवधी लोकांस भाकर आधी देऊ द्या. त्यांना पोटभर खाऊ दे. अन्नब्रह्म आधी द्या. मग विज्ञान-ब्रह्म, मग आनंद-ब्रह्म. परंतु आधी कोठला धर्म, कोठली संस्कृती? ते सारे- 'आधी कळस मग पायारं-,' असे होईल. कोट्यवधी उपाशी लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवावयास जो उभा राहिला, तो खरा धार्मिक, तो खरा हिंदू धर्माचा. तो खरा देवाचा उपासक, जगन्मातेचा उपासक, परंतु स्वतंत्र झाल्याखेरीज व स्वराज्य आल्याखेरीज हे कसे जमणार?

स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी. स्वातंत्र्य म्हणजे सुखसंपन्न होण्याचे साधन. अत:पर या देशात कोणी दु:खीकष्टी नको. सर्वांना स्वाभिमानाने जगता येऊ दे. विकासाच्या आड दारिद्र्य येता कामा नये. ज्ञानविज्ञानाचा प्रकाश सर्वत्र जाऊ दे. स्वच्छता, आरोग्य येऊ दे. अन्याय जाऊ दे. उपासमार जाऊ दे. नको लाचलुचपत, नको वशिले, नको कोणी उन्मत्त. सर्वांची सरळ मान होऊ दे. सर्वांना वाव असू दे. सर्वांना अन्नवस्त्र मिळो, राहायला साधे-सुधे घरदार असो. मिरासदारी कोणाचीच नको. जमीन नसेल त्याला जमीन द्या. ते स्वत:च कसायला तयार असले म्हणजे झाले. कामगारांचे हितसंबंध आधी संरक्षिले जावोत. अहिंसक रीतीने सर्वांना संघटना करण्याची मोकळीक असो. सरकारी सत्तेने कोणावर दडपण आणू नये. श्रमणाऱ्यांनी आपली प्रतिष्ठा ओळखावी. मालकांनी नम्रता शिकावी. वरच्यांनी खाली यावे; खालच्यांनी वर चढावे. दोघांनी एकमेकांस भेटून रामराज्य निर्माण करावे.

स्वातंत्र्यात असे हे सारे आपणास निर्मावयाचे आहे. एक नवे युग आजमावायचे आहे. एक नवी दृष्टी आजमावायची आहे. हे महान कार्य आहे. त्यासाठी सर्वांनी संयम पाळायला शिकले पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे उच्छृंखलपणा नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी. आपण एकमेकांच्या भावना ओळखावयास शिकले पाहिजे. सर्वांना सांभाळले पाहिजे. सर्वांना सन्मानिले पाहिजे. माझी जात, माझा प्रश्न, माझा प्रांत, माझी भाषा, माझा धर्म असे सारखे म्हणणे बरे नव्हे. अखिल भारतीय दृष्टी कधी विसरून चालणार नाही. एवढेच नव्हे तर आज भारतीय असूनही अतिभारतीय झाले पाहिजे. आपण जगाचे नागरिक एका अर्थाने झाले पाहिजे. म्हणून क्षुद्र कुंपणे घालू नका. क्षुद्र घरकुल नका बांधू. विशाल दृष्टी, व्यापक सहानुभूती याची अत्यंत आवश्यकता आहे. तरच संस्कृती फुलेल.

आपल्या सर्व व्यवहारांत एक प्रकारची नैतिक तळमळ हवी. स्वराज्य, लोकशाही म्हणजे थट्टा नाही. ही एक गंभीर वस्तू आहे. आपल्याला जनतेचे कल्याण करावयाचे आहे. एखाद्या जातीचे, पंथाचे स्तोम नाही माजवावयाचे. सार्वजनिक नीती म्हणून वस्तू आहे. इंग्लंडमध्ये प्रधानालाही त्याने सार्वजनिक वाहतुकीचा नियम मोडला म्हणून दंड करण्यात आला; परंतु आपल्याकडे काय प्रकार आहे? स्वराज्यात आपणच कायद्याची प्रतिष्ठा मानली पाहिजे. हातून बेकायदा काही झाले तर दिलगिरी दाखवावी. शिक्षा-दंड झाला तर भोगावा. अन्याय्य कायदे असतील तर त्यांच्या विरुद्ध आपण जनमत तयार करू शकतो; परंतु जे कायदे जनतेचे जीवन नीट चालावे म्हणूनच केलेले असतील ते मोडणे पाप आहे. ते मोडून त्यात प्रतिष्ठा मानणे म्हणजे तर महान पाप आहे. तो माझ्या पक्षाचा, तो माझ्या जातीचा, तो माझ्या धर्माचा, तो माझ्या प्रांताचा, तो माझा आप्त, तो माझा सखा, असले संबंध न्यायालयासमोर आणू नयेत. जनतेने हे शिकावयाचे आहे. जनतेच्या पुढाऱ्यांनी स्वतःच्या थोर वर्तनाने हे जनतेला शिकवावयाचे आहे.

आपण अजून सर्व राष्ट्राची, सर्व समाजाची अशी दृष्टी घेऊ शकत नाही. परंतु जोवर ही येत नाही तोवर लोकशाही म्हणजे एक थट्टा होईल. आलेले स्वातंत्र्य, मिळालेले स्वराज्य जर टिकवावयाचे असेल, कार्य जर करावयाचे असेल तर संकुचितपणा, क्षुद्रता, स्वार्थ इत्यादी गोष्टी आपण दूर करावयास शिकले पाहिजे. काहीतरी सार्वजनिक भान आपणास आले पाहिजे. स्वराज्याच्या महान साधनाने आपणास मानव फुलवावयाचे आहेत. संस्कृती समृद्ध करावयाची आहे. त्यासाठी



अखंड साधना हवी. जीवन अनेकांगी आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत, सर्व व्यवहारांत आपण साधकाच्या वृत्तीनेच वागण्याची धडपड केली पाहिजे. यालाच पुरुषार्थ असे म्हणतात. याचा अर्थ उत्तरोत्तर अधिक चांगले होण्याची खटपट करणे. एका अमेरिकन लेखकाने 'पुन्हा धर्माकडे' म्हणून एक सुंदर अनुभवजन्य पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने Betterism असा शब्द योजिला आहे. 'बेटरिझम' म्हणजे माणसाने चांगला होईन, अधिक चांगला होईन-, हा ध्यास घेणे होय. चांगले कसे होता येईल? जीवन अधिक समृद्ध, अंतर्बाह्य संपन्न कसे करता येईल? 'मी आणि माझे' हे तुणतुणे दूर करून दुसऱ्याच्या सुखदुःखाचा जेव्हा आपण विचार करू, सेवा करू, दुसऱ्याचे चांगले करू, सर्वांचे स्वागत करू, अधिक लोकांशी मिसळायला लागू, तेव्हा अधिक चांगले होण्याचा मार्ग लाभेल.

भारतीय जनतेला हे शिकावयाचे आहे. येथे अनेक प्रांत, अनेक भाषा, अनेक जातिप्रजाती, अनेक धर्म यांचा संगम आहे. अशा देशांत जर खरी संस्कृती वाढवावयाची असेल तर मिळते - जुळते घेऊनच वागावे लागेल. वैराचा अभाव आणि विषमता नसणे ही रामराज्याची दोन लक्षणे होत. हीच व्याख्या गांधीजींनी केली होती. पण त्यांनी पाहिले की स्वराज्याचे दर्शन झाले नाही तोच, वैराचे शमन होणे तर दूरच राहिले, वैराची अशी काही आग पसरली आहे की तिची क्वचितच तुलना असेल. हे पाहून स्वाभाविकच गांधीजी दुःखी राहात. ज्या वस्तूंचे पालन गांधीजींच्या जिवंतपणी आपण केले नाही ते आता केले पाहिजे. स्वराज्याची ही दोन लक्षणे आपण पूर्णपणे सिद्ध केली पाहिजेत. हिंदुस्थानात इतके विविध समाज राहात आहेत ते मित्रभावाचा पाठ शिकण्यासाठी होत असे आपण समजावे. आपल्या उदार संस्कृतीचा हा बोध जर आपण घेतला तर वैरभावही नाहीसा होईल आणि विषमताही समाप्त होईल. वैरभाव व विषमता नष्ट करण्याची थोर साधना आपणास करावयाची आहे.

महात्माजींचा प्रथम श्राद्धदिन भारतातच नव्हे तर सर्व जगात पाळला गेला. ते भारताच्या द्वारा जगाचीच सेवा करीत होते. कारण येथे सर्व धर्म, सर्व संस्कृती. भारत म्हणजे मानवजातीचे प्रतीक. गांधीजी जगाचे हृदय झाले होते. त्यांच्यावरच्या आघाताने सारे जग क्षणभर निर्जीव झाले होते. साऱ्या जगाने त्यांना श्रद्धांजली वाहावी हे समुचितच होय.